HM Inward No. ......02......
Date of Receipt ....20/07/2001......
Concerned Person/Dept. ...OFFICE......
Signature ...........

महात्मा गांधी विद्यामंदीर, इन्स्टिटयुट ऑफ
एच.एम.सी.टी., पंचवटी कॉलेज कॉम्पस,
पंचवटी, नाशिक या खाजगी संस्थेस
एच.एम.सी.टी हा पदवी अभ्यासक्रम सुरु
करण्यासाठी मंजूरी

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय, क्रमांक -पीईसी- २००१/(३७१/०१)तांशि.१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ३२
दिनांक :- १३ जुलै, २००१

संदर्भ: अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे
क्रमांक-एफ-७४०-८९/००१(एनडीईजीएच)/ईटी/२०००
दि. २७.६.२००१ चे पत्र.

शासन निर्णय:- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन दिनांक २७ जून, २००१ च्या पत्रान्वये महात्मा गांधी विद्यामंदीर, इन्स्टिटयुट ऑफ एच.एम.सी.टी., पंचवटी कॉलेज कॉम्पस, पंचवटी, नाशिक या खाजगी संस्थेस सन २००१-२००२ मध्ये एच.एम.सी.टी हा पदवी अभ्यासक्रम ४० प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यासाठी काही अटी व शर्तीवर मंजूरी दिली आहे. या मान्यतेस अनुसरुन संबंधित खाजगी संस्थेस या शासन निर्णयान्वये खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे :-

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता तंत्रशिक्षण संचालकांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) वरील अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणा संबंधित संस्थेने संबंधित विदयापीठाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण यांच्याकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५)एच.एम.सी.टी. पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश संबंधीत विदयापीठामार्फत करण्यांत येतील.

२. याबाबत आवश्यक त्या औपचारिक बाबींची पूर्तता करण्यासाठी संबंधित संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांच्याशी त्वरित संपर्क साधावा. संचालक, तंत्रशिक्षण यांनी याबाबत आवश्यक त्या नोंदी अभ्यासक्रम विषयक नोंद वहीत ठेवाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( श्या.र. चौरे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति.

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ~~पुणे~~ नाशिक

कुलसचिव, पुणे विदयापीठ, पुणे.

संबंधित संस्थेस.

प्रत, माहितीसाठी-

१)अतिरिक्त सचिव, (तांत्रिक) भारत सरकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली-११०००२.

२)सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक) भारत सरकार मनुष्यबळ विकास मंत्रालय, (शिक्षण विभाग) पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई